"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


**।। शत्रोरपी गुणा : ग्राह्या : ।।**

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५


| क्रमांक ४ | वर्ष : ४५ | जानेवारी–मार्च २०२४ |
|---|---|---|

**BOOK PACKET**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.


**नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!**

**हे वर्ष तुम्हां सर्व ज्ञातिबांधवांना सुखाचे समृद्धीचे व भरभराटीचे जावो**

**ही मंगेश–शांताई चरणी नम्र प्रार्थना!**

## हळदी कुंकू समारंभ - भगिनींस आमंत्रण

नेहमीचा मकरसंक्रांतीचा समारंभ यंदाही ठाणे येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकी सुनांसह अवश्य यावे ही विनंती.

**माहीम येथील तिळगुळ समारंभ**

कळविण्यास खेद होतो की दरवर्षी भरणारा महिलांचा मकर संक्रांतीचा तिळगुळ समारंभ यंदा स्वयंसेविकांच्या अभावी रद्द करण्यात येत आहे. संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

**– एन.के.जी.एस.बी संघ**

**ठाणे**

**सोमवार दिनांक १५–१–२०२४**

**वेळ : संध्याकाळी ४ ते ७**

**समारंभाचे ठिकाण :** ७, दीप दर्शन, सहयोग मंदीर रोड, नौपाडा, ठाणे.

**मोबाईल :** ९०८२६६२०१९

संपर्क: **सौ. ज्योती कि. सुखटणकर,**
**सौ. सुरेखा सु. पालेकर,**
**सौ. अश्विनी आ. वाघ.**

## संपादकीय

### ज्ञातिबांधवांनी उदार हस्ते दिलेल्या देणग्यांमुळे लाभार्थींच्या मासिक साहाय्यात भरघोस वाढ

संस्कृतमध्ये 'दाता भवति वा न वा' असे एक सुभाषित आहे. सुदैवाने त्याला आपला समाज अपवाद आहे. मुखपत्रिकेच्या प्रत्येक अंकात संघास मिळालेल्या देणग्यांचा तपशील असतो. त्यावरून ज्ञातीच्या दातृत्वाची सत्यता पटते. विशेष नमूद करावयाचे म्हणजे आपल्या ज्ञातीतील दानशूर व्यक्ती म्हणजे सौ. मंगला व श्री. अरुण भास्कर कसबेकर यांनी या वर्षी रु. ८१ लाख देणगी दिली आहे. त्यांनी दिलेल्या या देणगीमुळेच लाभार्थींना वाढीव साहाय्य देणे संघाला शक्य झाले. ही वाढीव रक्कम खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

**समाज सेवा लाभार्थी, एकूण ४४. प्रत्येकी रु. १२०० दर महिना.**

**वृद्ध सेवा लाभार्थी, एकूण १७. प्रत्येकी रु. १५०० दर महिना.**

ही वाढ एप्रिल २०२३ पासून देण्यात येत आहे. श्री. कसबेकर विविध प्रसंगी देणग्या देतात. त्याची एकूण रक्कम रु. १ कोटी ८० लाखाच्या वर आहे. या त्यांच्या योगदानाबद्दल संघ त्यांचे ऋणी आहेत. समाज बांधवांना नम्र विनंती आहे की त्यांनी देणग्यांचा ओघ असाच चालू ठेवावा जेणेकरून गरजूंना जास्त आर्थिक साहाय्य देणे शक्य होईल व वाढत्या महागाईला तोंड देता येईल.

**प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर**
– संपादक–

## प्रकाश झोत

### 'आमगेल्या' बँकेला सर्वात्कृष्ट बँकेचे द्वितीय पारितोषिक

बहुराज्यात विस्तार असलेल्या एन्केजीएस्बी कोऑप. बँकेला 'बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लिमिटेड, मुंबई' द्वारे २००१ कोटी रुपये आणि त्याहून अधिक ठेवी असलेल्या बँकेच्या श्रेणीतील आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी सर्वोत्कृष्ट बँक द्वितीय पारितोषिक अलीकडेच प्रदान करण्यात आले. बँकेच्या पदाधिकाऱ्यांनी समारंभपूर्वक हा पुरस्कार स्वीकारला. बँकेच्या संचालक मंडळाचे व कर्मचारीवर्गाचे अभिनंदन !

**एन्केजीएस्बीला तीन पुरस्कार**




**पुरस्कार स्वीकारताना सीए हिमांगी नाडकर्णी. सोबत उपाध्यक्ष सीए शांतेश वर्टी, संचालिका डॉ. अनुया वर्टी, व्यवस्थापक संचालक सुनील पानसे, सी एफ ओ सीए प्रणाली धराधर, एजीएम मृणाल मुणगेकर आणि झोनल हेड विश्वंभर वेंगुर्लेकर.**

नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँकिंग समिट, २०२३ मध्ये एन्केजीएस्बी सहकारी बँकेला फ्रॉंटियर्स इन को-ऑप. बँकिंग या गटांतर्गत मोठ्या नागरी सहकारी बँकांच्या श्रेणीत तीन प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट नागरी सहकारी बँक म्हणून आणि सर्वोत्तम मोबाइल बँकिंग ॲप उपक्रम म्हणून बँकेचा यावेळी गौरव करण्यात आला. बँकेच्या अध्यक्षा सीए हिमांगी नाडकर्णी यांना महिला लीडर ऑफ दि इयर घोषित करण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी गोवा सरकारचे सहकार मंत्री सुभाष शिरोडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




**UNCLAIMED DEPOSITS**

Publishing herewith the following information in Mukhapatrika for awarness.
RBI has launched a facility called UDGAM for claiming unclaimed deposits.
***Website : https://udgam.rbi.org.in***
I searched for Gaitonde, Kulkarni, Nadkarni and Wagle in Andheri, Jogeshwari and other areas. There are some unclaimed deposits in banks.
Thanks & Regards.
- Mihir A. Kulkarni



## वार्षिक स्नेह संमेलन

दरवर्षीप्रमाणे यंदाही भरलेले आपल्या ज्ञातिबांधवांचे स्नेहसंमेलन १९ नोव्हेंबर २०२३ रोजी नेहमीप्रमाणे उत्साहाने पार पडले. प्राचार्य बी.एन. वैद्य सभागृहात जवळ जवळ १५० च्या वर प्रेक्षकांनी हजेरी लावली. त्या दिवशी क्रिकेटची वर्ल्डकप फायनल मॅच असूनही आपल्या ज्ञातिबांधवांनी अगत्याचे येणे केले हे विशेष! प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. निनाद अनंत गंडभीर,जे वैद्यकीय क्षेत्रात दादासाहेब फाळके ॲवॉर्ड प्राप्त डॉक्टर आहेत ते सपत्नी उपस्थित होते. त्यांचा परिचय मुखपत्रिकेच्या मागील अंकात दिलेलाच आहे. यंदाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद मोहन कसबेकर व श्रीमती समीक्षा पालेकर यांनी उत्कृष्टपणे केले. सुरुवात श्रीमती प्रज्ञा वागळे यांच्या सुमधूर स्वागत गीताने झाली. नंतर नेहमीच्या प्रथेनुसार व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. तदनंतर निधन पावलेल्या ज्ञातिबांधवांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्तब्धता पाळून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

या नंतर ज्ञातीतर्फे संघाध्यक्षांनी प्रमुख पाहुण्यांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला. तसेच प्रमुख पाहुण्यांच्या पत्नी सौ. स्मीता यांना सोसायटीच्या अध्यक्षांनी पुष्पगुच्छ व सोसायटीचे स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला.

संघाचे अध्यक्ष मारुती दळवी व एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष देवदास नाडकर्णी यांनी आपापल्या संस्थांच्या गेल्या वर्षीच्या ठळक घटनांचा आढावा घेतला. या नंतर संघाचे उपाध्यक्ष शिरीष वाघ यांनी उपस्थितांना प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.

प्रमुख पाहुणे डॉ. निनाद अनंत गंडभीर यांनी अत्यंत सहज व सोप्या रितीने आपले विचार मांडले व ते सर्वांनाच अतिशय आवडले. त्यांच्या भाषणातील मुख्य मुद्दे आम्ही येथे मुद्दाम देत आहोत जेणेकरून जे ज्ञातिबांधव कार्यक्रमास पोहोचू शकले नाहीत त्यांनाही डॉक्टरांचे विचार जरूर पटतील असा विश्वास आहे.

डॉ. निनाद जिथे दवाखाना चालवतात त्या परळ भागामध्ये ९०% गिरणी कामगार व गरीब वस्ती होती. त्यात करोना काळात तर त्यांच्या नोकऱ्या गेल्या. ते पेशंट ट्रिटमेंटचे पैसे लिहून ठेवा म्हणू लागले. परंतु २ वर्षानंतर त्यातील ९०% लोकांनी डॉक्टरांचे पैसे फेडले. एक आजीबाई तर गावाला २ वर्षे होती. ती नातवाला घेऊन आली व चंची खोलून रु. १२०/- जे बाकी देणे होते ते देती झाली. यात त्या नातवावर संस्कार घरातल्या घरात झाले.

त्यांच्यात ''माणुसकी जपणारा डॉक्टर'' अशी ओळख निर्माण झाली. मदत करून मिळणारा आनंद चिरंतर व शाश्वत असा होता तर पैसे घेऊन मिळणारा आनंद क्षणभंगूर होता. या सर्वांची नोंद कुठेतरी घेतली जात होती. यामुळेच वैद्यकीय सेवेसाठीचा ''दादासाहेब फाळके ॲवॉर्ड'' त्यांना दिला गेला.

आज 'फॅमीली डॉक्टर' गायब झालेला दिसतोय. साध्या सर्दी खोकला किंवा तापाला आज लोकांना हॉस्पिटलमध्ये जावं लागतं. फॅमीली डॉक्टर हा पेशंट व कन्सल्टंट मधला दुवा आहे. फॅमीली डॉक्टरकडे जितक्या उघडपणे पेशंट दुखणे सांगतात तितके घरात सांगत नसावेत! फॅमीली डॉक्टर ही काळाची गरज आहे. या सर्व अनुभवांवर त्यांनी ''अकल्पित'' नावाचे पुस्तक लिहिले आहे.

तरुणांसाठी ते म्हणाले, यशस्वी होण्याचा कानमंत्र नसतो. यश म्हणजे आपल्या समोर ठेवलेले ध्येय. ते साध्य करणं व त्यातून समाधान प्राप्त करून घेणे. यश विकत मिळत नसतं. यश कुणा एकट्याचं नसतं, ते सामुहिक असतं.

समोर ध्येय ठेवा. हार्डवर्कची तयारी ठेवा. चुका घडल्या तरी डगमगू नका पण परत परत त्याच चुका करू नका!

अपयश पचविल्याशिवाय यश मिळत नाही. पॉझीटीव्ह रहा. Health is Wealth!

तदनंतर श्रीमती स्मिता निनाद गंडभीर यांची सौ. रुची मांजरेकर यांच्यातर्फे ओटी भरण्याचा कार्यक्रम झाला. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विवाहाची सुवर्ण जयंती गाठणाऱ्या जोडप्यांचे तसेच वयाचा अमृत महोत्सव साजरा करणाऱ्या ज्येष्ठ व्यक्तींचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

नंतर श्रीमती स्मिता निनाद गंडभीर यांच्या हस्ते एज्युकेशन सोसायटीच्या प्रावीण्य मिळालेल्या विद्यार्थी विजेत्यांना उत्तेजनार्थ बक्षीसे प्रदान करण्यात आली.

श्री. अरुण वाघ यांनी उपस्थितांचे आभार प्रदर्शन केले व शेवटी सर्व मुलामुलींनीही सर्व मान्यवरांसह व्यासमंचावर उभे राहून राष्ट्रगीत म्हटले. अशा रितीने ह्या भव्य सोहळ्याची सांगता झाली.

श्री. अरुण कसबेकर यांच्या ''कवडसे मनाचे'' ह्या पुस्तकाचा स्टॉल हॉलच्या एका बाजूला मांडण्यात आला होता. सूत्रसंचालकांनी व्यासमंचावरून या बाबत सर्व ज्ञातिबांधवांना ह्या पुस्तकाबद्दल माहिती दिली व सर्वांनी हे पुस्तक घ्यावे अशी आवर्जून विनंती केली.

सभागृहाबाहेरील बाजूला चहा पाण्याची व्यवस्था चोख करण्यात आली होती. तसेच सर्व ज्ञातिबांधवांना उपहाराचे पॅकेटस् जातेवेळी वाटण्यात आले.

**– प्रसाद (पंकज) कसबेकर**



## दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ आणि दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी

### गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांस बक्षीसे – एस्.एस्.सी. २०२३–२०२४

| **नाव** | | | **गुण** |
|---|---|---|---|
| १. | सारा संतोष देशपांडे, | आय.सी.एस्.ई. | ९८.८% |
| २. | संजाना आशीश मुळगांवकर, | एस्.एस्.सी. | ९८.०% |
| ३. | आर्या रवींद्र वर्टी | एस्.एस्.सी | ९७.८% |
| ४. | ईशान नागेश पै | आय्.सी.एस्.ई. | ९६.६% |
| ५. | शर्वणी मिलींद केंकरे | आय्.सी.एस्.ई. | ९५.०% |
| ६. | सौभ्या मंदार बोरकर | सी.बी.एस्.सी. | ९३.०% |
| ७. | सलोनी गौरीश सालगर | आय.सी.एस्.ई. | ९३.०% |
| ८. | अथर्व विनोद गायतोंडे | आय.सी.एस्.ई. | ८६.२% |
| ९. | पूनम वामन दिवेकर | एस्.एस्.एल्.सी. | ८४.१६% |

**एच.एस.सी. विज्ञान २०२३–२४**

१. पार्थ जीतेंद्र पालेकर – ९१.५%

२. अद्वैत विवेक भेडसगांवकर – ८२.८३%

**एच.एस.सी. – कला विभाग २०२३–२४**

१. गौरेश गिरीश वाघ – ८७.७७%

**पदवीधर गुणवत्ता धारक २०२३ –२४**

१. रिया चैतन्य नाडकर्णी – बी.फार्म. २. नवीन नरेंद्र नायक – बी.एस्.सी.

**विशेष यश बक्षीसे २०२३–२०२४**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | हर्ष गौतम वागळे | राष्ट्रीय चॅम्पीयनशीप कराटे (२०२३) | ब्रॉन्झ मेडल |
| २. | आर्या रवींद्र वर्टी | जिल्हा स्तरीय स्पर्धा | तिसरे बक्षीस |
| ३. | तक्षत दिनेश तेलंग | गीता जयंतोत्सव | पहिले बक्षीस |

**राष्ट्रीय भावना स्पर्धा**

४. सारा संतोष देशपांडे — भारत नाट्यम् अरंगेत्रम बक्षीस

**विशेष यश उच्चपदवीधर बक्षीसे २०२३–२०२४**

| | | |
|---|---|---|
| १. | साक्षी चेतन दिवेकर | सी.ए. |
| २. | सोनाली सुधीर कामत | एम्.बी.ए. रिटेल मॅनेजमेंट |
| ३. | अनीशा विनय भेंडे | एम्.एस्.सी. बायोटेक्नॉलॉजी |

## इतर गुणवत्ताधारक बक्षीसे २०२३–२०२४

| | |
|---|---|
| १. स्वरा सुशांत पालेकर | हिशोब करणारे उपकरण व मानसिक अंकगणितावर पारितोषिक |
| २. रुतुजा मंगेश धुमे (आय.इ.एस् मॉडर्न इंग्लीश हायस्कूल) | मुंबई विद्यापीठ संस्कृत विभाग व इंडियन एज्युकेशन सोसायटी संस्कृत विभाग कथाकथन स्पर्धेचे विशेष बक्षीस. |

## ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे (वर्ष २०२३–२०२४)

| | नाव | रहाण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | श्री. प्रकाश गणपत नेत्रावळी | पारले |
| २. | श्री. शशीकांत सुब्राव बोरकर | गोवा |
| ३. | श्री. अजीत रमाकांत बोरकर | अंधेरी |
| ४. | श्री. रवींद्र रमाकांत बोरकर | अंधेरी |
| ५. | श्रीमती सीमा अरुण वागळे | पारले |
| ६. | श्रीमती मंगल मंगेश गायतोंडे | दहीसर |
| ७. | श्री. सुभाष निळकंठ वागळे | जोगेश्वरी |
| ८. | श्रीमती लता श्रीपाद पिकळे | मुलुंड |
| ९. | श्रीमती डॉक्टर आसावरी विवेक भट | पारले |

**विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना २०२३–२०२४ वर्षिक स्नेहसंमेलनात स्मृतिचिन्हे देण्यात आली.**

त्यांची नावे :

**नाव ठिकाण**

१. श्रीमती शैलजा व श्री. देवदास अनंत नाडकर्णी, माहीम

२. श्रीमती शोभा व श्री.वेंकटराय मधुकर नाडकर्णी, माहीम


३. श्रीमती प्रभा व श्री. देवीदास गजानन नगर्सेकर, गोवा




MSIPL MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058

Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 346,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




*Indian Equity market has given avage 16% return s in last 32 year s...*

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

# "My Father DR. SADANAND NADKARNI"

A Grand inauguration of the Surgical Seminar Hall dedicated to Dr S.V.Nadkarni at LTM Medical College and LTM General Hospital popularly known as Sion Hospital was held on 16th September 2023 and attended by many of his students and colleagues . It was 75 years of Sion Hospital Celebrations. Baba Known as Prof or SVN was his usual self, accepting this rare honour with grace and humility and we the family were very proud and happy that his dedication and his contribution to Sion and the Trauma Care of India was recognised and honoured by Dean Dr Mohan Joshi by etching Babas name in Sion forever .

**Let me begin with his story**

Baba was a home delivery in a chawl in Girgaum on 3rd May 1932,to Umabaia homemaker and Vinayak Nadkarni a simple clerk.Not the eldest, but looked upon as the spine of the family by all siblings. Every oneat home called him Sada& his friends called him Nadya.

His early beginnings were tough due to financial constraints andso , frugal living was part of his life and also his early learnings for being cost effective. The family moved to Pune when he was in 4th std and Pune is where he had his true education and influence And made him a surgeon, Dr Sadanand Vinayak Nadkarni.

From his early age of 10 years, for a period of over 12 years he laboured along with freedom fightersinRashtraSeva Dal (RSD) –making roads , digging wells , marching for the freedom struggles, reading and listening to great socialist leaders like Ram Manohar Lohia, S.M.Joshi, G.P Pradhan and Gandhian teachings by Acharya Bhagwat, whose ideals he still carries.

He was multitalented and selected to sing solo on the 1st Independence day “Rashtrageet” from atop the Shanivarwada.

After completing his MBBS and MS General Surgery from BJ.Medical College and Sasoon Hospital , he moved to Mangalore. Wenlock hospital was more like a Zilla Medical centrewhere he worked with very limited resources to serve the needy. After 5 years of this experience, he joined Goa Medical College as Associate Professor.Patients from all of Goa , Sawantwadi ,Karwar,Cancona, etc. would come there.

SVN was a Plastic surgeon , Oncosurgeon , Paediatric Surgeon and General surgeon all rolled into one and the only one attending the Ribandar hospital where he was the Surgeon.



“Dotor Nadkarni” a Konkani speaking surgeon in Goa was looked upon as if a God figure.

His dedication to patients was unparalleled, often going to the hospital in the middle of the night for any emergencies.He has personally treated Satya Sai Baba for appendicitis.

In 1972, he lost a niece due to appendicitis and that encouraged him to return to Mumbai.Selected through a competitive interview, in Aug 1973, Baba joined Sion Hospital and LTM Medical College, as Head of Dept of Surgery.

Though he was entitled to a bigger, plusher apartment at Worli, we moved into the British built Barracks because,proximity to his patients was his main concern. Welived amongst clerical and other staff.

Baba never had discrimination of caste, religion, etc and this is something both me and my brother have learned from him.The house was open to all and Chaya Geeta , PhoolKhilehaiGulshanGulshan, movies,etc on the black and white Bharat TV meant more than 50 to 60 people gathering in our verandah. This taught us about sharing with the less privileged.

When he joined Sion Hospital in 1973, there was no official department of Surgery or an office. However, Baba, being an obsessive perfectionist and a task master,started the department from scratch and developed its robust teaching programme.

His appearance with his high waist trouser and moustache gave him a nickname of “Charlie Chaplin” but his strict attitude and the same moustache gave him another title as “Hitler”. But in the longest time mostly everyone referred to him as “SVN”and “Prof”.He was known for his never die attitude so another popular nickname he got was -“James Bond”and by a strange coincidence his room number on the new Dean's office was 007.

Sion was his Karma Bhumi from 1973 till retirement in1990

To his credit goes the creation of Indias 1st Trauma Centre.

Any reference to Sion hospital, be it any article in papers or even Wikipedia, the one department that shines is Trauma Care He also started the 1stemergency Ambulance with an in built operation theatre and later initiated the Golden Hour Project in 1982 which was inaugurated by Prime Minister Rajeev Gandhi in 1984.

“SVN” Coma Scale which every Surgical resident used to stage the Coma of patient , was an easy to use scoring devised by himfor assessing Head Injury patients. It's a proud moment for us, that his granddaughter Reeva has,in her

ICMR project, compared the internationally used Glasgow Coma Scale to the SVN scale and found the SVN scale to be more reliable.

This organisation of the trauma care he created , saw patients transported by rail and ambulance and many lives were saved during major train accidents, fires and chemical explosions across city of Mumbai and suburbs.

This experience paved the way later in life, where he was invited by Health Minister Amonkar of Parrikar Govt to become Advisor to Goa Govt. to start its 1st Emergency Trauma Care Department and eventually which is now 108 services.

Apart from trauma, Sion Hospital was the busiest municipal hospital then, drainingpatients from very high density slums and the suburbs. Baba developed the Gastroscopy dept, which is well recognized even today and also created the foundation for Integrated Care for the Critically Ill, which much later got recognised as the Critical Care speciality.

After his retirement form Sion, Baba took on the challenge of being in the private sector and worked as Medical Director in Bhatia and Jaslok hospitals. Both places showed a great financial turnaround after he took over.

This was possible due to his penchant for cost efficiency in healthcare systems, and the scientific andethical use of clinical medicine to reduce investigations.

He has published many books and articles, All devoted to better health care with less costs. He learnt computers after the age of 70 and we gifted him with a laptop on his 80th birthday.

Even at his age of 91, SVN thinks of tomorrow which belongs to the future generation. Kumar Ketkar, a Rajya Sabha Member and Editor of Maharashtra times, said, "Nadkarni nahyawayaat suddha udyadis to. Bahu dalokhya wayaata aplya bhoot kala vishayi boltaat".

Baba has always been concerned about pollution and the environment. He installed Solar system in Sion in early 80s, which was a very revolutionary idea then. He has experimented with wind energy, jatropa oil and solar energy at various times in his retired life.

All his teachings and the way he led his life has had a profound impact on the way we, his children and grandchildren, lead our lives. We have made efforts not to be influenced by people's religion or caste.

In our Pikale Nursing home, we had installed Solar panels saving a lot of electricity and used electric car (Reva) to reduce Carbon footprints. Baba's leadership and administrative qualities have inspired me to dabble in things



outside my regular gynaecology practice. I have been the President of the Association of Medical Consultants in Mumbai.

And I have also been Director Maharashtra Healthcare Sector Skill Council and am presently advisor to TISS and Trustee of GLRA amongst many other things I have done. In all this, Baba has been an inspiration and guiding force.

Baba was a strict disciplinarian and I have to share that I had to repeat a term in Surgery in 2nd year. I had developed jaundice and so missed a few days in my surgery posting in Dr Karmarkars Unit. DrKarmarkar told me,"Your father has instructed me to give you a repeat …I can't do anything."

Baba's point was that, all postings had to be completed properly in order to understand all subjects better. Being the Prof's daughter did not include any privileges for absenteeism.

A karma yogi by nature and socialist at heart, Baba never chased awards, nor lobbied for them.Many others actually stole some credit of his work. If I would raise the issue, he said awards weren't his goal.

With this man in each and every step of his journey, was my mother, Suhasini Nadkarni, a woman of steel with a heart of gold and a nature soft as butter.A person who made friends with everyone around and spread joy wherever she went. She was always feeding all Students of SVN. I know that some students would say "Sir keghar me jaake sir ka battikhane ka …kyunki fir madam pyaar se puchtihaikhanakhaya ? tohnahiblne ka, …aurphir superb khanakhane ka "

I can only say that God has been really very kind to me to have given me the honour and privilege to be born to such illustrious and fantastic parents. Along with my brother a well known ophthalmologist Dr Shivram Nadkarni , his architect amazing wife Vibha and my husband Dr Hemant Pikale a leading surgeon we bow to God for all the blessings he has showered on our family .

Dr. Sangeeta Pikale
MBBS.DGO.FCPS.MD.
DHM. LLB
9821075536
**drshpikale@gmail.com**

# कुटुंबव्यवस्थेची मोडकळ थांबणे गरजेचे

**– मीरा तेलंग प्रभुवेर्लेकर**

**आजच्या उच्चशिक्षित मुलींनी 'इगो', 'अॅटिट्यूड' या कुटुंब पोखरणाऱ्या जंतूंचा नायनाट करून आपली संस्कृती, समंजसपणा आणि संयम ही त्रिसूत्र अंगी बाणवून संसारात समरस होऊन कुटुंबस्वास्थ्य आणि पर्यायाने समाजसास्वास्थ्य तंदुरुस्त राहील याची जबाबदारी घ्यावी एवढेच वाटते.**

परवाच व्हॉटस्‌अॅपवर एक व्हिडिओ पाहिला. आधुनिक तंत्रज्ञानाचा एक सुंदर नमूनाच तो. एका चेहऱ्याच्या वरील अर्ध्य भागावर दुसऱ्या एका चेहऱ्याच्या खालचा अर्धा भाग एकमेकांना जुळवला जाऊन एक नवीन चेहरा तयार करणारी ती तांत्रिक किमया. असे अनेक अर्धे चेहरे वरच्या एकाच स्थिर असलेल्या चेहऱ्याच्या अर्ध्या भागाला जोडून अनेक चेहरे वरच्या एकाच स्थिर असलेल्या चेहऱ्याच्या अर्ध्या भागाला जोडून अनेक चेहरे बनतात. दोन भिन्न चेहऱ्यांपासून एक चेहरा बनवलाय याची सुतराम कल्पना पाहणाऱ्याला येणार नाही. खरे कौशल्य हे की, दोन्ही चेहऱ्यांचा आकार, कपाळ, डोळे, नाक, ओठ, भुवया, गाल, हनुवटी या कशाकशामध्ये थोडेसुद्धा साम्य नाही. तरीही 'अॅडजस्टमेंट' किंवा जुळवणी करून ही कलाकृती यशस्वीपणे साकारलेली आहे. म्हणजे 'विसंगतीतून सुसंगती' कशी साधावी याचे हे प्रात्यक्षिकच आहे जणू! ही किमया पाहून माझे विचार पटकन सध्या समाजात कुटुंबव्यवस्थेला हादरा देणाऱ्या 'घटस्फोट' या सामाजिक विकाराकडे जाऊन थबकले.

संसारातही त्यानंतर दोन भिन्न घराण्यातून आलेल्या, भिन्न संस्कारात – वातावरणात – पालनपोषणात वाढलेल्या भिन्न स्वभावाच्या, भिन्न प्रवृत्तीच्या दोन व्यक्ती एकत्र येतात. दोघांमध्ये पूर्णपणे साम्य असणे केवळ अशक्य. मग ते प्रेमविवाह असोत वा नियोजित. वरील चित्रफितीप्रमाणे 'भिन्नतेतून एकता' हे तंत्र संसारातही साधले गेले तर घटस्फोटाचे प्रमाण बरेचसे कमी होऊ शकेल असे मला वाटून गेले.

लग्न ही जीवनातील एक पारंपरिक आणि महत्त्वपूर्ण सामाजिक जीवनपद्धती आहे. भारतीय संस्कृतीत विवाहाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मागील पिढीचा विचार केल्यास, त्या काळातील पती-पत्नी, देवाने स्वर्गात बांधलेल्या या गाठी अधिक घट्ट बांधूनच जीवन कंठायचे आहे, अशी खूणगाठ मनाशी पक्की बांधूनच बोहल्यावर चढत आणि संसार निभावून नेत. लग्नानंतर लक्षात आलेली एकमेकांची उणी-दुणी, वाट्याला आलेली सुखदु:खे हे सारे 'पदरी पडलं पवित्र झालं' अशा समजूतदारपणाने आयुष्याला सामोरे जात, त्यांच्याशी मनाविरुद्ध खूप काही घडले असावेच ना? परंतु 'तडजोड' करूनच संसार चालवला पाहिजे, हे संस्कार त्यांच्यावर आपसूकच झालेले असत.

आज? चित्र पार पालटलेले दिसते. लग्ने अगदी सहजपणे मोडली जातात. 'आज लग्न, उद्या विघ्न आणि परवा ते भग्न', असे चाललेय आणि या बातम्या रोजच्याच झाल्याने कुणालाही



त्याविषयी फारसे काही वाटेनासे झालेय. पटत नाही तर रोजच्या भांडणापेक्षा घटस्फोट हाच मार्ग सुखाचा, असा निर्णय घेतला जातो. पूर्वी घटस्फोटांची संख्या नगण्य अशीच होती आणि तो निर्णय बहुतांशी पुरुषांकडूनच घेतला जाई. आज यासाठी मुलीचाच अधिकतम पुढाकार असतो.

हा एवढा बदल कसा झाला?

मुलगी शिकली, उच्चशिक्षित झाली, कमवती झाली. साहजिकच ज्ञान, आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन, आत्मविश्वास, हे सारे आत्मनिर्भरतेसाठी उपयुक्त असे वैभव तिला शिक्षणामुळे मिळाले. ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाचीच गोष्ट आहे. परंतु स्वकमाईच्या जोरामुळे त्यांच्यामधील 'अहं' चेकाळलाय का? त्या बेदरकार झाल्या आहेत का? असे प्रश्न उद्भवतात. लग्नानंतर काही वर्षातच नाही तर महिनाभरातच घटस्फोट झालेली उदाहरणे ऐकिवात आहेत. तेही मुलींच्या पुढाकाराने, तशीच गंभीर कारणे म्हणजे – षंढ असणे, व्यभिचारी असणे, अतिमद्यपानाचे व्यसन असणे, असह्य शारीरिक आणि मानसिक छळ, अत्याचार करणे ही नवऱ्यापासून वेगळे व्हायला लावणारी कारणे समर्थनीयच आहेत. अशा पुरुषांसोबत स्वाभिमानी सुशिक्षित मुलगी राहूच शकत नाही. परंतु आज घटस्फोट होण्याची कारणे ऐकली तर त्यांना वेडबिड लागलेय की काय असे वाटते.

छोट्या छोट्या गोष्टींसाठी होणाऱ्या मतभेदाचे स्तोम माजवून शेवटी स्वत:मधल्या 'अहं' ची ताकद दाखवण्यासाठी संसार मोडला जातो. मग असा प्रश्न विचारावासा वाटतो की लग्नापूर्वी स्वत:च्या घरातल्या स्वजनांशी मतभेद होतात म्हणून त्यांना सोडून जाण्याची हिंमत त्यांनी कधी दाखवली का? नाहीच दाखवणार. कारण पुढचे सगळे आयुष्य घालवायला हातात पैसा नको? निराधारतेमुळे तिथे जुळवून घेतले असेलच ना? आई-वडिलांच्या वेगळे होण्यामुळे मुलांच्या कोवळ्या मनावर आणि भविष्यावर किती विपरीत परिणाम होतो याचा तरी विचार करावा नं!

याचा अर्थ मुलींनी मुकाटपणे अन्याय सहन करावा, असा होत नाही. पण अजिबात जुळवूनच घ्यायचे नाही, एवढ्यातेवढ्या कारणावरून घटस्फोटासारखे टोकाचे पाऊल उचलणेही योग्य नाही. बरे, आवडत नाही अशा मुलाशी आईवडिलांनी जबरदस्तीने विवाह करवून दिला असेही नसते.

राहून राहून नवल याचे वाटते की, अलीकडचे होतात ते प्रेमविवाह किंवा 'लिव्ह इन...' मधून लग्नाआधी, बराच काळ एकमेकांची नीट ओळख झाल्यानंतर केलेले विवाह. तरीही पर्यवसान घटस्फोटातच? याचा अर्थ जमवून घेणे नाहीच! तर मग जुन्या पिढीतील लोकांची, लग्नाआधी संपर्क तर सोडाच, साधे बोलणेही न होता 'कांदे-पोह्या'च्या कार्यक्रमात जमवलेली लग्ने आयुष्यभर कशी टिकून राहिली? त्याची ना होती ओळख ना पाळख, संसार एकमेकांसोबत राहून तडीस नेण्याला 'तडजोड' नावाचे रामबाण अस्त्र त्या गृहीणीजवळ होते.

तेव्हा आजच्या उच्चशिक्षित मुलींनी 'इगो', 'अॅटिट्यूड' या कुटुंब पोखरणाऱ्या जंतूंचा नायनाट करून आपली संस्कृती, समंजसपणा आणि संयम ही त्रिसूत्र अंगी बाणवून संसारात समरस होऊन कुटुंबस्वास्थ्य आणि पर्यायाने समाजस्वास्थ्य तंदुरुस्त राहील याची खबरदारी घ्यावी एवढेच वाटते.

## पिसाट वारा

असा आहे पिसाट खट्याळ वारा
बरसती सरसर जीवनधारा
तांडव चाले, दर्या तीरी
तरंग उसळे लाटा किनारी
तुषारांचे छमछम नर्तन
झुला झुलती नौका बेभान
असा वाहे पिसाट खट्याळ वारा
बरसती सरसर जीवनधारा
तरुलतांना हींव भर
पर्ण फुलांचा सडा विखुरे
खगगण कोटरी दडे
अधांतरी भिरभिरे पाचोळा
असा वाहे पिसाट खट्याळ वारा
बरसती सरसर जीवनधारा
धरणीची काहिली संपली
आली आली वर्षाराणी
गोड गारवा हिरवा परिसर
आनंद ओसरे चराचर
असा वाहे पिसाट खट्याळ वारा
बरसती सरसर जीवनधारा

**– कुंदा देसाई,** मुंबई
९८१९०५२३१९

**IMPORTANT ANNOUNCEMENT**

M/S Borkar & Muzumdar were appointed Statutory Auditors for the year ending 31st March 2024 in the 116th AGM of The NKGSB Industrial & Education Society and 72nd AGM of The NKGSB Sangh held on 30th September 2023. M/S Borkar & Muzumdar vide letter dated 16th November 2023 addressed to The Society and The Sangh have submitted registration as Statutory Auditors due to their pre-occupation in other assignments. In view of this following notice is given to the members.

**THE NORTH KANARA G.S.B. I & E SOCIETY**
**LAXMI SADAN, 361, V. P. ROAD, MUMBAI 400 004.**
**NOTICE TO MEMBERS**

Notice is hereby given that a Special General Body Meeting of The NKGSB Industrial & Education Society will be held on 20th January 2024 at 3.30 pm at the above address to appoint Statutory Auditors for the year ending 31st March 2024 up to the date of next Annual General Meeting and to fix their remuneration.

Mumbai — **Shri Rajeev D. Gaitonde**
15.12.2023 — Honorary Secretary


**THE NORTH KANARA G.S.B. SANGH**
**LAXMI SADAN, 361, V. P. ROAD, MUMBAI 400 004.**
**NOTICE TO MEMBERS**

Notice is hereby given that a Special General Body Meeting of The NKGSB Sangh will be held on 20 th January 2024 at 4.30 pm at the above address to appoint Statutory Auditors for the year ending 31st March 2024 up to the date of next Annual General Meeting and to fix their remuneration.

Mumbai — **Shri Uday M. Nadkarni**
15.12.2023 — Honorary Secretary



# MUZY SAYS




***This 471 page book available @500 instead of Rs 699 ( inclusive of courier, in India only). This offer valid till 31st March for community members only.***
***Email : muzumdar71@gmail.com***

**About the book:**

Real life incidents and experiences which are funny at times and realistic in nature. This is an attempt to provide knowledge and valuable inputs on various topics. Along with observations, and analysis amongst people; humour has been added to make it interesting. The gist of the articles is to provide a good understanding of the happenings in life, the Dos and Donts, positivity and negativity, which will provide your brain with an opportunity to introspect and also understand how the outside world behaves in various situations. Family, friends, colleagues, animals, nature, everything is there for you to enjoy reading. Have fun.

**About Author**

Avinash Muzumdar is a financial consultant and an ex banker with a spiritual thought process that guides him in decision making and writing articles. He believes that investment in people and equity (share market) are the beat investments in life. Loves music, travelling and enjoying good food.

Strong believer in the process of gaining and sharing knowledge while ensuring that healthy vibes are passed on to every person he meets.

## दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ आणि दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी

# वार्षिक स्नेह संमेलन २०२३



प्रमुख पाहुणे दीप प्रज्वलीत करताना.



संघ अध्यक्ष मारुती दळवी
भाषण करताना



एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष
देवदास नाडकर्णी
भाषण करताना



## दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ आणि दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी

# वार्षिक स्नेह संमेलन २०२३



प्रमुख पाहुणे डॉ. निनाद गंडभीर
भाषण करताना



गुणवत्ता धारक विद्यार्थी
प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते
बक्षिस घेताना.




संघ व सोसायटीचे सभासद
प्रमुख पाहुण्यांबरोबर

# दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ

## *ठाणे मंच "नाचो गाओ मौज मनाओ" कार्यक्रम*



ऐंशी पार
श्रीमती सुहासिनी नाडकर्णी
नृत्य करताना



"नाचो–नाचो मौज मनाओ" चा
बहारदार कार्यक्रम



अरुण कसबेकरां समवेत
ठाणे मंचाचे उपाध्यक्ष सुरेश पालेकर,
सचिव राजेश दिवेकर, सभासद अश्विनी वाघ
मुखपत्रिकेचे संपादक प्रसाद कसबेकर



प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद





# ठाणे मंच ''नाचो गाओ मौज मनाओ'' कार्यक्रम

शिस्तबद्ध व उत्तम नियोजन म्हणजे काय असते ते ठाणे मंचच्या वरील कार्यक्रमातून २६ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी तेंडुलकर हॉलमध्ये दिसून आले. जवळ जवळ २०० च्या वर ज्ञातिबांधव जमा झाले असताना श्री. सुरेश पालेकर व त्यांचे साथी राजेश दिवेकर तसेच श्री. गिरीश रेगे यांनी अतिशय उत्तम रितीने कार्यक्रम यशस्वी करून सर्वांची शाबासकी घेतली.

जोगेश्वरी व ठाणे येथून बस आयोजित केल्यामुळे सर्वांचा प्रवास सोयीचा व आरामाचा झाला. सुरुवातीलाच खमंग वडे व चहा हा अल्पोपहार झाल्यावर श्रीमती हेमांगीनी कुलकर्णी व श्री. प्रदीप दाभोळकर ह्यांनी उत्तम सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचा विशेष म्हणजे अगदी ५ वर्षांच्या मुलापासून ते ९० च्या वर पोचलेल्या वृद्धांपर्यंत सर्वांनी यात भाग घेऊन ''नाचो नाचो'' नाव सार्थ केले. कार्यक्रमात विविधता होती. शास्त्रीय नृत्य, बॉलीवूड डान्स, योगावर आधारित नाच, शिट्टीवर गाणे, नकला असे वेगवेगळे प्रकार होते. सर्व जण खेळीमेळीने एकमेकांशी कारवारीत बोलत, गप्पा मारत, कौतुकाची थाप देत होते.

मुखपत्रिकेचे सर्वेसर्वा डी. एन्. नाडकर्णी यांना ओळखत नाहीत अशी व्यक्ती आपल्या समाजात नाही. वय व प्रकृति अस्वास्थ्यामुळे त्यांनी राजीनामा दिल्यानंतर आज त्यांचा वारसा श्री. प्रसाद कसबेकर चालवतात. ठाणे मंचचे उपाध्यक्ष श्री. सुरेश पालेकर यांनी त्यांचे स्वागत करून ओळख करून दिली. त्यांच्या अंगी असलेल्या विविध कलांपैकी एक गायन...

''जीना यहां मरना यहां इसके सिवा जाना कहाँ... '' हे गाणे म्हणून सर्व उपस्थितांकडून त्यांनी वाहवा मिळवली. सर्व कलाकारांना, कार्यकारी मंडळ सभासदंना व स्वयंसेवकांना श्री. अरुण कसबेकर यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली.

घरी परतताना सर्वांना खाऊच्या बॉक्सचे वाटप करण्यात आले. एक वेगळाच जिव्हाळ्याचा, आपुलकीचा बंध घेऊन मंडळी घराकडे निघाली.

**– सुजाता यार्दी – मंगेश पालेकर – शैलेजा नाडकर्णी**

=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:=:

## ''माझी माती माझा देश''



''माझी माती माझा देश''चा समापन समारंभ अण्णाभाऊ साठे सभागृह, भायखळा येथे ११ ऑक्टोबर २०२३ रोजी महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री श्री. दीपक केसरकर यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमात श्री. मंगलप्रभात लोढा (पालकमंत्री, मुंबई उपनगर) तसेच महापालिकेचे आयुक्त श्री. इक्बाल चहल वगैरे इतर मान्यवरांचीही उपस्थिति होती.

माझे वडील स्वातंत्र्यवीर कै. श्री. भालचंद्र पालेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे चिरंजीव या नात्याने माझा या समयी स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

माझे वडील कै. श्री. भालचंद्र पालेकर यांनी ''मीठाच्या सत्याग्रहा''मध्ये एक स्वातंत्र्यवीर म्हणून हिरिरीने भाग घेतला होता व त्यासाठी त्यांना इंग्रजांच्या राजवटीत ३ महिने तुरुंगवास भोगावा लागला होता.

**– मंगेश पालेकर**



# AMGALE NIRPHANASA JHAD !

The Breadfruit tree , or colloquially called "Nirphanas" is a ubiquitous tree native of coastal India; particularly in places like Karwar and Mumbai. When I used to visit my maternal grandparent's house in Karwar; a huge bread fruit tree used to be in our backyard; by the side of the deep well, which was the source of drinking water to the household.. When some stray leaves from the tree would fall into the well, my grandfather would fish them out with a hook attached to a long rod. At my paternal grandfather's house in Santacruz in Mumbai, also there used to be a bread fruit tree in the compound.

The breadfruit tree grows into a huge tree with a broad bark and wide branches. Its leaves are also broad,hand shaped . But it's fruit "Nirphanas" is unlike the edible variety of jackfruit which is sweet and commonly available in the market. But this is used only in making vegetables and kaap .The typical gravy is prepared by grinding together ingredients like fresh coconut, dried badgi red chillies and tirphal juice sqeezed into the mixture. The bread fruit can also be sliced into kaap , and dusted with salt, semolina , and red chilli powder. Most GSBs would swear it as their all time favourite !My mother has also included the recipes in her culinary book titled " Karwar Cuisine".

While it is a most wanted fruit by GSBs , it is not popular in other parts of Maharashtra including Pune. Neither Konkanasta nor Karadhe Brahmins in Pune know about it. Passersbyoften enquire " what is the fruit? How do you eat it? How do you cook it?"

Two trees that my father "imported" from Goa , where he was the Vice Chancellor of Goa University (1990-95) were the breadfruit tree and the Mankurad mango of Goa. Both the trees have taken root in our Pune bungalow; and we are reaping " fruits of his labour" so a to say ! This year , we had a bumper harvest of the fruits . I felt great joy and gratefulness in sharing the fruits with our community friends and relatives in Pune and Mumbai ! Indeed the Nirphanas is our identity.

**- Dr. Medha Dubhashi**
**901116545**

### *''कारवारची ताजी खबर''*

## कारवार येथे कर्करोगाच्या जागृतीसाठी मोहीम

कर्करोगाचे वाढते प्रमाण चिंताजनक होत चाललेले आहे. याची कारणे म्हणजे शहरातील ग्रामीण जनतेचे या रोगाच्या गांभीर्याविषयी असलेले अज्ञान किंवा त्याचे ज्ञान असूनही आरोग्याच्या बाबतीत केली जाणारी बेपर्वाई. त्यासाठी या विषयावर जनजागृती होण्याची गरज लक्षात घेऊन कारवारवासीयांनी एक मोहीम हाती घेतली. कारवारमधील ''कॅन्सर अवेरनेस फोरम'' या सामाजिक संस्थेने मंगळूर येथील ''ऑनकॉलॉजिकल सर्व्हिसेस'' या संस्थेच्या सहकार्याने कार्यक्रम आयोजित केला. २९ ऑक्टोबर २०२३ रोजी ''हॉटेल अज्वी ओशन'' येथे एक सभा तसेच शहरात जागृती फेरी आयोजित करण्यात आली.

सभेस व्यासपीठावर आमदार सतीश सैल, कारवार म्युनिसिपालटीचे अध्यक्ष डॉ. नितीन पिकळे, रेड क्रॉस सोसायटीचे अध्यक्ष श्री. व्ही. एम्. हेगडे, मंगळूर येथील कॅन्वीनचे ऑनकॉलॉजीचे तज्ञ वैद्य यांनी उपस्थिती लावून उद्बोधक विचार मांडले. कर्करोग विमुक्तीची आंतरिक तळमळ असलेले रोहीत माधव कामत, प्रीतम मसूरकर, दिलीप नाईक आणि त्यांचे अन्य सहकारी यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे हा संपूर्ण कार्यक्रम अतिशय योग्य रितीने संपन्न झाला.उपरोल्लेखित सर्व संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे आणि सर्व कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि धन्यवाद.

**– रोहीत माधव कामत, कारवार.**

## श्री. मुरलीधर मठ, कारवार

## शताब्दी महोत्सव

मुरलीधर मठाचा शताब्दी महोत्सव मोठ्या थाटामाटात विविध धार्मिक विधी तसेच मनमोहक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

संपूर्ण कार्यक्रम १७ नोव्हेंबर पासून २१ नोव्हेंबरपर्यंत ५ दिवस अतिशय मंगलमयी वातावरणात पार पडला. हा संपूर्ण सोहळा मुरलीधर मठाच्या कारवार कमिटीतर्फे परमपूज्य श्रीमत् विद्याधीशतीर्थ स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली यथोचित रित्या संपन्न झाला.

परमपूज्य श्रीमद् विद्याधीशतीर्थ स्वामीजी हे गोकर्ण पर्तगाळी मठ, गोवा येथील २४ वे पीठाधीश आहेत. मुरलीधर मठाची स्थापना १९२३ साली पर्तगाळ मठाचे पीठाधीश परमपूज्य श्रीमद् इंदिराकांत स्वामीजींच्या शुभ हस्ते झाली होती.

ह्या मठासाठीची जागा कारवार येथील सुविख्यात हळदीपूर कुटुंबाने देणगी रुपाने अर्पण केली होती.

**– मच्छींद्र कसबेकर, कारवार**



## कारवारी पाककृति

## *''कैरीचे लोणचे''*

लेखिका : **सौ. माधवी (मृणाल) कसबेकर**
B-११०३, स्वप्नलोक टॉवर्स, पिंपरीपाडा, मालाड (पूर्व), मुंबई ४०००९७.
मोबाईल : ९९३०८५२४८५

**मार्च ते एप्रिल मध्ये बिनबाठाच्या कैऱ्या मिळतात म्हणून मी खास तुमच्यासाठी कारवारी चेपणीच्या लोणच्याची रेसिपी देत आहे.**
**हे लोणचे चांगले वर्षभर टिकते.**

**साहित्य :** २ किलो मध्यम आकाराच्या बिनबाठ्याच्या कैऱ्या, ४०० ग्रॅम खडा मीठ, १५० ग्रॅम खडा हिंग, ४ ते ५ हळकुंड, मिरची पावडर साधारण १ ते पाऊण फुलपात्र, २ चमचे राई, २ चमचे मेथी दाणे, साधारण २ मोठे चमचे 'दळलेली राई' व १ फुलपात्र तीळाचे तेल.


**कृति :** प्रथम कैऱ्या ओल्या फडक्याने स्वच्छ पुसून मग सुक्या फडक्याने पुसून घ्याव्या. त्यांचे मसाला भरण्यासाठी चार भाग करावेत. आतील कोवळी कोय काढून टाकावी. भांड्याच्या आतल्या बुडाला मूठभर मीठ पसरून घ्यावे. कैऱ्यांमध्ये मीठ भरून त्या भांड्यात ठेवाव्यात. मग वरून वजनासाठी चेपण म्हणून मोठा दगड (वरवंटा किंवा रगड्याचा दगड) ठेवावा. वरून तलम कपड्याने बांधून ठेवावे. तीन दिवसांनी कैऱ्यांना पाणी सुटलेले असेल व कैऱ्या पोपटी रंगाच्या झालेल्या असतील. त्या कैऱ्या एका कपड्यावर काढून घ्याव्या. मिठाचे पाणी दुसऱ्या भांड्यात काढून उकळून घ्यावे. (मिठाचे पाणी जास्त आटवायला नको) उकळी आल्यावर साधारण ४–५ मिनिटाने गॅस बंद करावा. मग तो खार गाळून घेऊन थंड करावा. तीळाचे तेल गरम करून नंतर ते थंड करून घ्यावे.

**मसाला :** हळकुंड, हिंग, राई व मेथीचे दाणे वेगवेगळे तेलात परतून घ्या व ते मिक्सरमध्ये सुके वाटून घ्या. नंतर त्यात मिरची पावडर घालून एकत्र करावे व त्यात थोडे थोडे मिठाचे पाणी घालून घोळून घ्यावे. भज्यांच्या पिठासारखे पण जरा जाडसरपणा येईल असे बघा. त्यात कच्ची राई पूड मिसळा.

चिनी मातीच्या भरणीला आतून तेलाचा हात फिरवा. आता कैऱ्यांमध्ये मसाला भरून त्या भरणीत ठेवाव्यात. त्यावर चेपणीला गुळगुळीत स्वच्छ दगड ठेवा. भरणीवरती कपडा बांधून ठेवा. दुसऱ्या दिवशी थंड झालेले तेल त्यात घाला. झाले कैरीचे लोणचे तैय्यार!

(लोणचे कसे झाले ते नक्की कळवा. काही शंका असल्यास वरील मोबाइलवर संपर्क साधावा.)

## श्रद्धांजली



**डॉ. श्रीकांत शांताराम वागळे**
निधन - २६ ऑक्टोबर २०२१
(निधन समयी वय - ९५ वर्षे)

**(डॉ. श्रीकांत शांताराम वागळे हे अतिशय हुषार व मेहनती तसेच दानशूर म्हणून त्यांची ख्याती होती.)**

B.Sc. मध्ये First Class मिळाल्यावर त्यांनी मणीपाल मेडीकल कॉलेजमधून डॉक्टरची पदवी प्राप्त केली.

मुंबईत नळबाजार येते कुंभारवाडा गल्ली नंबर २ मध्ये दवाखाना थाटून प्रॅक्टीस सुरू केली. शिवाय L.I.C. मध्ये Medical Examiner म्हणून त्यांनी नोकरीही केली.
ते गरीबांचे डॉक्टर म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी गरीबांकडून १ पैसाही न घेता त्यांना ट्रिटमेंट दिली.
ॐ श्री मंगेश त्यांच्या आत्म्याला शांती देवो.

**- श्रीमती नीता श्रीकांत वागळे (पत्नी)**
शांती सदन, फ्रेंच ब्रीज, मुंबई ७. - फोन ०२२-२३६८५६७९
**स्मरणकर्ते :** श्रीमती नीता वागळे, श्री. समीर वागळे, श्री. संदीप वागळे, श्रीमती वीणा एम. तिळवे, श्री. मंदार एस्. तिळवे, श्री. रोहन एम्. तिळवे, श्रीमती नेहा एम्. तिळवे.
मोबाईल नं. ९८२०५०३१३९


# SHREE HOMOEPATHIC PHARMACY

**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**
**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**




## कॅप्टन सूरज

**'साऱ्या जगाचे जहाजाकडे लक्ष'**
**कॅप्टन सूरज वैद्य यांना मोठा बहुमान**

पूर्वाश्रमीची आरती रजनीकांत वागळे, मूळ गांव बाड, कारवार, रहाणार भांडूप, मुंबई यांचे पति श्री. सूरज जयप्रकाश वैद्य यांनी खाली लिहिल्याप्रमाणे फार मोठा बहुमान प्राप्त केला आहे.

पवन ऊर्जेवरील जगातील पहिल्या जपानी मालवाहतुकीच्या जहाजाचे सारथ्य कॅप्टन सूरज जयप्रकाश वैद्य यांनी करून जगात एक विक्रम प्रस्थापित केला आहे. त्याबद्दल त्यांचे आपल्या ज्ञातितर्फे कौतुक व त्यांच्या पुढील आयुष्यात असेच नवनवीन प्रयोग ते घडवत राहोत ही श्री चरणी नम्र प्रार्थना!

### ☺ ☺ ☺ विजूलें चुटकुलें ☺ ☺ ☺

**१) चलो - (बापायक विचारता) वर्गातल्या सगळ्या चल्याल्यो आवय शाळेत सोडच्याक येतात. मागीर तुमी माका कित्याक सोडच्याक येतात?**
**बापय - अरे पुता, सगळ्याल्यो आवय येतात म्हनच तर हांव येता!**
**२) घोव : काल तू माका निदे भितर सवता शिली.**
**बायल : तुमगेलो किते तरी गैरसमज झाल्लो आसा.**
**घोव : कसलो गैरसमज?**
**बायल : हांव निदे भीतर आशील्ले म्हण!**

**विजय वागळे मो. : ९२२१६०७५७७**

अरुण भास्कर कसबेकर यांच्या '' **कवडसे मनाचे** '' ह्या पुस्तकाला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. तरी अजून ज्यांना हे पुस्तक विकत घ्यावयाचे असेल त्यांनी NKGSB SANGH च्या Office मध्ये संपर्क साधावा.
ऑफीस फोन नंबर मुखपत्रिकेच्या कव्हर पेजवर दिला आहे. धन्यवाद.

### देणगीदारांना सूचना

✻ काही हितचिंतक संघाच्या बँक खात्यात देणगीदाखल रकमा जमा करतात. अशा व्यक्तींचा पत्ता व इतर तपशील उपलब्ध होत नाही. अशा देणगीदारांनी संघाच्या ऑफीसमध्ये तपशील पाठविण्याची कृपा करावी म्हणजे पावती बनवण्यास सोईस्कर होईल. (किंवा इमेल वर कळवले तरी चालेल.)

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या
## (मागील अंकानंतर )
## उल्लेखनीय देणग्या

**१) उद्योगश्री श्री. सतीश वाघ यांजकडून संघाला सहा लाख रुपयांची देणगी**

गोरेगांव येथील सुप्रिया लाईफ सायन्सचे मालक श्री. सतीश वामन वाघ हे कर्तबगार उद्योजक म्हणून त्याना मिळालेली बक्षिसे, पारितोषिके व प्रशस्तीपत्रके याबद्दल मुखपत्रिकेत वेळोवेळी उल्लेख आलेला आहे. हशम प्रेमजी, सुधा मूर्ती, बिल गेटस् अशा ज्ञानशूर व्यक्तींशी त्यांची तुलना करता येईल. अनेक सेवाभावी संस्थांना त्यांनी आर्थिक साहाय्य दिलेले आहे. अलीकडेच त्यांनी संघाला सहा लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील प्रत्येकी दोन लाख रुपये आई वडील श्रीमती आशा व श्री. वामन सुब्राव वाघ व आजोबा डॉ. बाळकृष्ण पुंडलीक देसाई यांच्या स्मरणार्थ आहेत.

**२) श्रीमती प्रशांता रेगे यांजकडून पाच लाख रुपयांची देणगी**

सोलापूर येथे वास्तव्यास असणाऱ्या श्रीमती प्रशांता मंगेश रेगे यांनी अलीकडेच पाच लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील अडीच लाख रुपये प्रत्येकी पती श्री. मंगेश कृष्ण रेगे यांच्या स्मरणार्थ वृद्ध सेवा निधीसाठी व आई वडील श्रीमती मालती व श्री. माधव दत्तात्रय बोरकर यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

**३) श्रीमती सुमती विठ्ठल बोरकर यांच्या स्मरणार्थ दोन लाख व एक रुपयांची देणगी**

श्रीमती सुमती विठ्ठल बोरकर यांचे सुमारे दोन वर्षांपूर्वी निधन झाले. त्या अविवाहित होत्या. त्यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला दोन लाख व एक रुपयाची देणगी मिळाली आहे.

**४) श्रीमती भावना व नंदकुमार नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दोन लाख रुपयांची देणगी**

गोव्यामध्ये स्थायीक झालेले श्रीमती भावना व श्री. नंदकुमार वेंकटराव नाडकर्णी यांचे अलीकडेच निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांची कन्या श्रीमती मोनिका अभिजीत आध्ये यांनी एज्युकेशन सोसायटीला दोन लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**५) कु. विदुला पालेकरतर्फे एज्युकेशन सोसायटीला ८० हजार रुपयांची देणगी**

चारकोप येथे रहाणारे श्री. मनोहर बाळकृष्ण पालेकर यांची नात कु. विदुला बाळकृष्ण पालेकर हिच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला ८० हजार रुपयांची देणगी मिळाली आहे.

**६) श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी**

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी हे ज्ञातीच्या संदर्भातील क्षेत्रात विशेष रस घ्यायचे. त्यांनी व त्यांच्या पश्चात त्यांच्या आप्तेष्टांनी अनेक वेळा संघाला भरघोस देणग्या दिल्या आहेत. त्यांचा नातू कवीश दूर्गानंद (मच्छींद्र) कसबेकर, नातसून अरुंधती व पणती रिया गेली काही वर्षे श्री. कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्धसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांच्या देणग्या देत आहेत. यंदाही त्यांनी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**७) डॉ. नरेन्द्र यार्दी यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी**

डॉ. नरेन्द्र रामतीर्थ यार्दी हे आयआयटी पवईचे डॉक्टरेट आहेत व बडोदा येथे त्यांचा व्यवसाय आहे. मागे दोन वेळा त्यांनी एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या. अलीकडेच त्यांनी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.



**८) श्रीमती नलीनी पालेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दोन लाख रुपयांची देणगी**

गोवा येथे राहणारे श्री. गुरुप्रसाद यशवंत पालेकर यांनी अलीकडेच आपल्या मातोश्री श्रीमती नलीनी यशवंत पालेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दोन लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील एक लाख रुपये वृद्ध सेवा निधीसाठी आहेत व उर्वरीत एक लाख रुपये एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती इंदिरा व श्री. शंकर सदाशिव वागळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. किशोर यांजकडून | ५,००० |
| २ | पितृपक्षानिमिव पूर्वजांच्या स्मरणार्थ श्री मनोज गोविंद भांडारकर यांजकडून | २,५०० |
| ३ | पती श्री. रामदास काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सिंधू यांजकडून | १,५०० |
| ४ | पितृपक्षानिमित्त पूर्वजांच्या स्मरणार्थ अनामिकेकडून | ५,००० |
| ५ | पितृपक्षानिमित्त पूर्वजांच्या स्मरणार्थ श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | ५,००० |
| ६ | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २७ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अजित यांजकडून | १,००१ |
| ७ | श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या जन्मदिनाप्रसंगी पुत्र श्री. पराग यांजकडून | २५,००० |
| ८ | श्रीमती नीलम शांताराम कुलकर्णी यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे पती श्री. शांताराम (अरुण) सदानंद कुलकर्णी यांजकडून | ५,००० |
| ९ | वडील श्री. वामन सुब्राव वाघ व आई श्रीमती आशा वामन वाघ व आजोबा डॉ. पुंडलीक बाळकृण देसाई यांच्या स्मरणार्थ श्री. सतीश वामन वाघ यांच्याकडून (प्रत्येकी २ लाख) | ६,००,००० |
| १० | भाऊबीजेनिमित्त बहीणी कै. श्रीमती यमुनाताई, सपाताई व सिंधुताई यांच्या स्मरणाप्रीत्यर्थ श्री. मंगेश शंकर बोरकर (पारले) यांजकडून | ३,००३ |

## वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ

१ श्रीमती स्नेहलता गोविंद कसबेकर यांच्या नवव्या पुण्यतिथीनिमित्त
पुत्र नी. विनय यांजकडून ३,०००

२ श्री. दीपक जगन्नाथ गायतोंडे यांच्या ७३ व्या जन्मदिनाप्रसंगी
पुत्र श्री. ओंकार यांजकडून ५,००१

३ श्री. वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शांता यांजकडून २५,०००

४ श्री. जिवबा नागेश सरदेसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा यांजकडून २५,०००

## वृद्ध सेवा निधीसाठी

१ श्रीमती सुनंदा मोहन भेडसगावकर यांच्या ७५ व्या वाढदिवसा प्रसंगी
पुत्र श्री. विवेक यांजकडून ७,५००

*२ श्रीमती नलिनी यशवंत पालेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र
श्री. गुरुप्रसाद यांजकडून १,००,०००

३ श्री मोहन रामचंद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ नातु
श्री. वरद विलास मोंडकर यांजकडून १०,०००

*४ श्री. मंगेश कृष्णराव रेगे यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती प्रशांता यांजकडून २,५०,०००

५. श्रीमती मालती आणि श्री. दिनकर वामन वर्टी यांच्या पुण्यतिथीनिमित्त
कन्या श्रीमती रेखा मिलिंद तेलंग व श्रीमती मीनल सतीश भुजले यांजकडून ५,००१

६ श्रीमती मीरा व श्री. गोपाळ सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त
पुत्र सर्वश्री मिलिंद व निमीष यांजकडून ५,००१

७ श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २७ व्या पुण्यतिथीनिमित्त
पुत्र श्री. अजित यांजकडून १,००१

८ श्रीमती गीता व श्री. गंगाधर (बापू) पालेकर यांच्या स्मरणार्थ
पुतणी श्रीमती नयना अशोक कुलकर्णी यांजकडून २५,०००

*९ श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ नातु
श्री. कवीश दुर्गानंद कसबेकर, नातसून श्रीमती अरुंधती व
पणती कुमारी दिपा यांजकडून ५०,०००



## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१. श्रीमती बेला रवींद्र यांजकडून १५,०००

*२. श्रीमती भावना व श्री. नंदकुमार वेंकटराव नाडकर्णी यांच्या
पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती मोनिका अभिजित आध्ये यांजकडून २,००,०००

*३. श्रीमती नलिनी यशवंत पालेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र
श्री. गुरुप्रसाद यांजकडून १,००,०००

*४. श्रीमती सुमती विठ्ठल बोरकर यांच्या स्मरणार्थ २,००,००१

*५. श्रीमती मालती व श्री. माधव दत्तात्रय बोरकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ
कन्या श्रीमती प्रशांता मंगेश रेगे यांजकडून २,५०,०००

*६. डॉ. नरेंद्र रामतीर्थ यार्दी यांजकडून ५०,०००

७. श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २७ व्या पुण्यतिथीनिमित्त
पुत्र श्री. अजित यांजकडून १००१

८. श्री. रवींद्र श्रीकांत वैद्य यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती तनुजा यांजकडून १५,०००

९. श्री बाळगोपाळ केशव आचार्य यांच्या जन्मशताब्दी
निमित्त उल्का कुलकर्णी यांजकडून २,००१

*१०. विदुला बाळकृष्ण पालेकर यांजकडून देणगी
एज्युकेशन सोसायटीला ८०,०००

११. श्रीमती प्रेमा गंगाधर वागळे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त
नातू श्री. ओंकार दीपक गायतोंडे यांजकडून ५,००१

## ठाणे मंच – देणग्या

१. श्री. लिलाधर सालगर, प्रभदेवी १,०००

२. कु. निया दुर्गेश पालेकर, जोगेश्वरी ३,०००

**।। कालाय तस्मै: नम: ।।**

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १) | जयश्री शिवराम बोरकर | कडवाड | मुलुंड |
| २) | ✲ अपर्णा (नलिनी) सदानंद देसाई | कडवाड | ठाणे |
| ३) | शीला मधुकर (अमरनाथ) गायतोंडे | अंकोला | पुणे |
| ४) | अरविंद विश्वनाथ गायतोंडे | हळगा | बोरिवली |
| ५) | पूर्णानंद मंगेश कुलकर्णी | अवर्सा | गोवा |
| ६) | प्रशांत महाबळेश्वर मुझुमदार | अंकोला | टेक्सास |
| ७) | दिगंबर (सुकू) गोविंदराव मुजुमदार | अंकोला | अंधेरी |
| ८) | अमीता अंबरीष नगर्सेकर (पूर्वाश्रमीतील कुमुदिनी भवानीशंकर पिकळे) | अंकोला | पारले |
| ९) | अरविंद गणपत नाडकर्णी | सांवर पै | अमेरिका |
| १०) | सुधीर मंगेश नाडकर्णी | सदाशिवगड | बोरिवली |
| ११) | सुधा मेघश्याम नाडकर्णी | सांवर पै | चेंबूर |
| १२) | जगदीश भास्कर नाडकर्णी | अंकोला | डोंबीवली |
| १३) | वीणा सुरेश पावशे भट | बाड | बाड |
| १४) | भास्कर निळकंठ पावशेभट | बाड | शीव |
| १५) | गोविंद (अरुण) भवानी वर्टी | सदाशिवगड | बोरिवली |
| १६) | श्री. दिलीप वसंत (वशा) वागळे | बाड | गिरगांव |
| १७) | कला शशिकांत कबे (पूर्वाश्रमींच्या कला विठ्ठल वागळे) | बाड | पुणे |
| १८) | मीना प्रमोद कुलकर्णी (पूर्वाश्रमींच्या मीना प्रभाकर स्थळेकर) | हळगे | माहीम |

✲ देहदान केले.

## नवीन दूरध्वनी क्रमांका विषयी सूचना

संघाच्या ऑफीसचा दूरध्वनी क्रमांक (AIR TEL Landline) बदलण्यात आला आहे. तरी सर्व सभासदांनी नवीन नंबरची नोंद घ्यावी व या पुढे गिरगांव ऑफीसला खाली दिलेल्या नंबर वरूनच संपर्क साधावा.


**(जुने दोन्ही नंबर्स बाद करण्यात आलेले आहेत.)**

**धन्यवाद !** **– एन्. के.जी. एस्. बी. संघ**

**नवीन नंबर : ०२२ – ४७४९ ८२५९**



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक **प्र. मो. कसबेकर** यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.